बीड । गुरूवार
१७.०७.२०२५
वर्षे : ५ अंक : १०७
किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● https://marathwadapatra.com
# मराठवाडा पत्र
■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■

dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955 पान:१




# पंतप्रधान नरेंद्र मोदी माझ्या सिंदुरला न्याय देतील का ?
# महादेव मुंडे यांच्या पत्नीची पंतप्रधानाकडे याचना



- ● जिल्हा पोलीस अधीक्षकावर विश्वास ; न्याय कधी मिळणार !
- ● ज्ञानेश्वर मुंडेची एसपी कार्यालयातच विषारी औषध प्राशन करून आत्महत्याचा प्रयत्न
- ● पोलीस कर्मचाऱ्यात धावपळ ; जिल्हा रुग्णालयात दाखल !
- ● प्रकृती स्थिर ; आरोपी अटक कधी होणार !

### ●मुंडे हत्या प्रकरण तपास गुन्हे शाखेकडे वर्ग

महादेव मुंडे हत्या प्रकरणात आता नवव्यांदा तपासी अधिकारी बदलले आहेत. आता हा तपास स्थानिक गुन्हे शाखेकडे देण्यात आला आहे, अशी माहिती स्थानिक गुन्हे शाखेचे प्रमुख बंटेवाड यांनी दिली आहे. यामुळे तपासाला गती मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. दरम्यान, तपास वर्ग होताच तपासाला सुरुवात झाली असून स्थानिक गुन्हे शाखेची पथके परळीकडे रवाना झाल्याची माहिती समोर येत आहे.

**बीड । प्रतिनिधी**

देशाचे पंतप्रधान यांनी काश्मीरमध्ये झालेल्या अतिरेकी हल्लयाचा बदला घेत ऑपरेशन सिंदूर राबवले. मात्र माझ्या पतीची हत्या होऊन दीड वर्ष लोटले तरीही मला न्याय मिळत नसल्याने थेट नरेंद्र मोदी यांनाच ज्ञानेश्वरी मुंडे यांनी माझ्या सिंदूरला न्याय कधी मिळणार असल्याची खंत व्यक्त करत थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे मदतीची व न्यायाची याचना केली आहे.

परळी येथील व्यापारी महादेव मुंडे यांची गेल्या दीड वर्षांपूर्वी हत्या करण्यात आली होती. या प्रकरणातील आरोपींना अद्यापही अटक न केल्यामुळे महादेव मुंडे यांच्या पत्नी ज्ञानेश्वरी मुंडे यांनी प्रशासनाला आत्महत्या करण्यासंदर्भात निवेदन दिले होते. मात्र पोलीस प्रशासनाकडून गेली दीड वर्ष फक्त कागद काळे करण्यात आले आरोपींना अद्यापही अटक न झाल्यामुळे बीड येथे जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयातच ज्ञानेश्वरी मुंडे यांनी विष प्राशन करून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. या प्रकारामुळे जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयात काही काळ गोंधळाची स्थिती निर्माण झाली होती. ज्ञानेश्वरी मुंडे यांना तत्काळ जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात



आले. महादेव मुंडे हत्या प्रकरणाला १८ महिने उलटूनही न्याय मिळत नसल्याने संतप्त झालेल्या ज्ञानेश्वरी मुंडे यांनी थेट पोलीस अधीक्षक कार्यालयातच विषारी औषध प्राशन केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेने जिल्ह्यात आणि प्रशासकीय वर्तुळात एकच खळबळ उडाल्याचं पहायला मिळतंय. न्याय मिळत नसल्याने त्यांनी यापूर्वीच आत्मदहनाचा इशारा दिला होता. ज्ञानेश्वरी मुंडे यांनी पोलिसांना आजपर्यंतचा अल्टिमेटम दिला होता. त्यानंतर आता त्यांनी टोकाचं पाऊल उचललं आहे. महादेव मुंडे यांची २१ ऑक्टोबर २०२३ रोजी परळी शहरातील तहसील कार्यालयासमोर निघृणपणे हत्या करण्यात आली होती. २० ऑक्टोबर २०२३ रोजी ते मुलांना ट्यूशनमधून घरी सोडून गेले होते. त्यानंतर रात्री त्यांचे रक्त लागलेले मोटरसायकल वन विभागाच्या कार्यालयाजवळ सापडले. दुसऱ्या दिवशी सकाळी (२१ ऑक्टोबर) त्यांचा मृतदेह

▶▶ उर्वरित पान २ वर

### ●माझ्या सिंदूरला न्याय कधी: ज्ञानेश्वरी मुंडे

परळी येथील व्यापारी महादेव मुंडे यांची अत्यंत निर्गुण पणे हत्या करण्यात आली. गेली दीड वर्ष मुंडे कुटुंब न्यायासाठी लढा देत आहे. ज्ञानेश्वरी मुंडे यांनी यापूर्वीही आत्महत्याचा प्रयत्न केला होता. जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालत आत्मदहन करण्याचा इशारा दिला होता मात्र जिल्हा पोलीस अधीक्षक सोबत चर्चेनंतर तो टाळण्यात आला. मात्र कार्यालयाच्या बाहेर येताच ज्ञानेश्वरी मुंडे यांनी विषारी औषध प्राशन केले. तत्पूर्वी त्यांनी अत्यंत उद्दीग्न होऊन प्रशासन कसे संत गतीने काम करत असल्याचा आरोप करत माझ्या सिंदूरला न्याय कधी मिळणार याची थेट याचनाच देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे केली.

### ●पोलीस अधीक्षकावर विश्वास ; मात्र यंत्रणावर नाही

नूतन जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्यावर विश्वास व्यक्त करत आपण आतमध्येहन करणार नसल्याचे ज्ञानेश्वरी मुंडे यांनी म्हटले होते मात्र मागील दीड वर्षापासून या प्रकरणात आमचं कुटुंब उध्वस्त झाले असून अद्यापही आम्हाला न्याय मिळाल्या नसल्याची भावना व्यक्त करत जवळ असलेले विषारी औषध प्राशन केल्याने जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालत एकच गोंधळ उडाला. जिल्हा पोलीस अधीक्षकांनी या प्रकरणा गंभीरतेने तपास यंत्रणेला सूचना दिले आहेत मात्र तरीही आरोपी अटक होत नसल्याने मुंडे कुटुंब न्यायाच्या प्रतीक्षेत आहे. जिल्हा पोलीस अधीक्षकावर विश्वास आहे मात्र यंत्रणा नसल्याचे ज्ञानेश्वरी मुंडे यांनी म्हटले आहे.

## नारायण गड, गड नसून श्रद्धा-अस्मिता-स्वाभिमान आहे सुरू असलेले वादंग अशोभनीय : नाईकवाडे, धांडे

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्याची धाकटी पंढरी म्हणून प्रचलित असलेले नारायण गड जिल्ह्यासह उभ्या महाराष्ट्रात प्रसिद्ध आहे वा गडाची लोकप्रियता अफाट असून लाखो लोकांची श्रद्धा गडावर आहे गडाला एका समाजाचेच लोक मानणारे आहे असे मुळीच नाही तर सर्व अठरा पगड जातींच्या लोकांचे गडावर प्रेम आहे गडासोबत अनेकांच्या भावना, अस्मिता आणि श्रद्धा जोडल्या गेल्या आहेत. त्यामुळे सध्या सुरू असलेलेवादा अशोभनिय असल्याचे गडाचे भक्त अविनाश नाईकवाडे आणि महेश धांडे यांनी फाकात म्हटले आहे. या सर्व लोकांच्या श्रद्धा, अस्मिता आणि प्रेमाचा कुठे तरी खेळ मांडल्या सारखी परिस्तिथी झाली आहे काहींनी हे ▶▶ उर्वरित पान २

## पोलीस ठाण्याच्या हाकेच्या अंतरावर तीन दुकानात चोरी

**चकलंबा । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील चकलंबा येतील तीन दुकानात चोरी ही घटना मंगळवारी रात्री चारच्या सुमारास झाली या दुकानातील अंदाजे ३० तें ३५हजार रुपयाचे मोटार रिवायडींग दुकानातील स्क्रॅप मटेरियल चोरी गेला आहे संत सावता माळी चौक येथील विघ्नहर्ता मोटर रिवाडिंग या दुकानातील २६ हजाराचे स्क्रॅप मटेरियल गेले व किसान मोटार रिवायडींग यामधील स्क्रॅप असणार वायर दहा ते पंधरा हजाराच तसेच करिष्मा मेडिकल मधील परफिम च्या ८ तें १० बाटल्या व गल्लयातील हजार ते बाराशे रुपये रोख रक्कम चोरी गेली आहे. चकलंबा पोलीस पंचनामा करून पुढील तपास करीत आहे . मात्र पोलीस ठाण्याच्या हाकेच्या अंतरावर असणाऱ्या सुरक्षित



ठिकाणीही चोरी होत असेल तर गावातील इतर भागाचे काय असा प्रश्न उपस्थित होत आहे.

## दामिनी पथकाकडून मुलींना आत्मसंरक्षणाचे धडे

**बीड । प्रतिनिधी**

पोलीस अधीक्षक नवनीत कॉंवत यांच्या आदेशाने व मार्गदर्शनाखाली दामिनी पथक प्रमुख झडख पल्लवी जाधव आणि त्यांचे टीमकडून शाळा, कॉलेज मधे भेट देवून मुलींना आत्म संरक्षणचे धडे देण्यात येत आहे. दामिनी पथक हे मुली , महिला आणि बालकांसाठी काम करते. यामध्ये शाळा, कॉलेज, क्लासेस, वसतिगृह, स्वाधारगृहला भेटी देवून मुलींच्या समस्या जाणून घेणे. मागील आठवडय़ात जि. प. शाळा पाली येथे महिला आयोग सदस्य व दामिनी पथकाने सक्षम तू या अभियाना अंतर्गत, मुलींना विविध विषयावर मार्गदर्शन केले होते. तर दिनांक १४/०७/२०२५ रोजी दामिनी पथकाकडून संगमेश्वर विद्यालय नाळवंडी माध्यमिक शाळेतील मुली आणि बालकांना, बालकांचे अधिकार, बाल लैंगिक अत्याचार अधिनियम, गुडटच-





बॅडटच, बालविवाह प्रतिबंध कायदा, महिलांना भारतीय संविधानाने दिलेले मुलभूत अधिकार अशा अनेक विषयावर व कायद्याबाबत मार्गदर्शन केले तसेच दैनंदिन वापराच्या वस्तूने आत्मसंरक्षण कसे करायचे याबाबत माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांना तत्काळ मदती साठी टोल फ्री हेल्पलाईन ११२, १०९१, १०९८ वर कॉल करणे तसेच पोलीस अधीक्षक कार्यालयाकडून उपलब्ध करुन देण्यात आलेला टठ कोड वर तक्रार करणेबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

त्याचप्रमाणे दामिनी पथक हे शहरात तसेच तालुक्याच्या ठिकाणी जावून बस स्टँड, शाळा, कॉलेजच्या समोर, क्लासेस अशा वर्दळीच्या ठिकाणी गस्त करुन रोडरोमियोवर कारवाई करत आहे.

बीड शहर व जिल्ह्य़ातील महिलांना सार्वजनिक ठिकणी, शाळा, महाविद्यालय परिसरात, कामाच्या ठिकाणी कोणी रोडरोमिओ विनाकारण त्रास देत असेल किंवा छेड काढत असेल तर वर नमुद टोल फ्री क्रमांक किंवा संवाद प्रकल्प टठ उेवश वर तात्काळ तक्रार करण्याचे आवाहन पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉंवत यांनी केले आहे.

## बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी पोथरा येथे चालवून पाहिले डुबे ( कोळपणी यंत्र )

**नेकनुर । प्रतिनिधी**

तालुक्यात नेकनूर मंडळात केजच्या हद्दीला लागून पोथरा हे गाव आहे . या गावी बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके , नेकनूरचे मंडळ अधिकारी पंडित नाईकवाडे , पोथऱ्याचे तलाठी अक्षय चव्हाण , तलाठी सर्वेश कांबळे , तलाठी प्रशांत नलावडे यांनी भेट दिली . यावेळी मधुकर साहेबराव दराडे , सुरेश हावळे उपस्थित होते.

शेतकरी कोळपणी करत असल्याचे बघून तहसीलदार थांबले. मलाही कोळपणी



करण्याचा अनुभव घेऊ द्या , असे त्यांनी बोलून दाखविले . त्या ठिकाणी कोळपणी करण्याची पद्धत समजून घेतली . स्वतः कोळपणी करण्याचा अनुभव घेतला . शेतकरी दराडे यांच्याशी गप्पा मारताना त्यांनी माहिती घेतली. यावेळी दराडे यांनी माहिती दिली की त्यांच्या शेतात बहुतांश वेळा सोयाबीन हेच पीक घेतल्या जाते . जमीन सुपीक असली तरी बारमाही पाण्याची व्यवस्था नसल्याने त्यांना खरिपात हेच पीक परवडते . यापूर्वी ते

▶▶ उर्वरित पान २ वर






### सुपर कनेक्टिव्हीटी असणारे महाराष्ट्रातील एकमेव शहर ठरणार चौथी मुंबई...

# भारतातील ९ मोठे प्रोजेक्ट डायरेक्ट कनेक्ट होणार



महाराष्ट्र हे प्रचंड वेगाने विकसीत होत आहे. महाराष्ट्रात नवीन शहर देखील विकसीत केली जात आहेत. मुंबई आणि नवी मुंबई या शहरावर येणार ताण कमी करण्यासाठी महाराष्ट्रात तिसरी मुंबई उभारली जात आहे. तर, दुसरीकडे चौथ्या मुंबईचे देखील प्लानिंग सुरु आहे. चौथी मुंबई हे सुपर कनेक्टिव्हीटी असणारे म हाराष्ट्रातील एकमेव शहर ठरणार आहे. देशातील ८ मोठे प्रोजेक्ट डायरेक्ट चौथ्या मुंबईला कनेक्ट होणार आहेत.

महाराष्ट्रात चौथी मुंबई निर्माण करण्याचा प्लान तयार केला जात आहे. चौथी मुंबई हे मुंबई, नवी मुंबई आणि तिसऱ्या मुंबईपेक्षा सुपर कनेक्टिव्हीटी असणारे शहर ठरणार आहे. पालघर जिल्ह्यात प्रस्तावित वाढवण बंदर प्रकल्प उभारला जात आहे. या परिसरात चौथी मुंबई उभारण्याची योजना आहे. महाराष्ट्रातील वाढवण बंदर हा मोदी सरकारचा ड्रीम प्रोजेक्ट आहे. समुद्रकिनाऱ्यावर २० मीटरपेक्षा जास्त खोली असलेलं हे देशातील एकमेव नैसर्गिक बंदर आहे. त्यामुळे अजस्त्र कंटेनर येथे सहज येवू शकतात. जवळपास २९८ मिलियन टन क्षमतेचं हे देशातील १३ व्या क्रमांकाचं बंदर असेल.या बंदरातून कोळसा, सिमेंट, केमिकल आणि तेल यांची वाहतूक करता येईल. वाढवण बंदर पूर्णपणे विकसित झालेल्यानंतर जगातील टॉप १० कंटेनर पोर्ट देशांच्या यादीत भारताचा समावेश होणार. वाढवण बंदर हा प्रकल्प जवळपास ७६ हजार कोटी रुपयांचा आहे.

वाढवण बंदर संपूर्ण देशासाठी गेमचेंजर ठरणार आहे. या वाढवण बंदराचे काम पूर्ण होई पर्यंत पालघरमध्ये मुंबईजवळील तिसरे विमानतळ तसेत रस्ते उभारले जाणार आहेत. वाढवण बंदराजवळच चौथी मुंबई उभारण्याचा प्लान आहे. वसई, विरारपासून पुढे पालघरकडे चौथी मुंबई निर्माण केली जाणार आहे. मुंबईतील कोस्टल रोड पालघरच्या वाढवण बंदरापर्यंत नेला जाणार आहे. देशातील ८ मोठे प्रोजेक्ट चौथ्या मुंबईला डायरेक्ट कनेक्ट होणार आहेत. दिल्ली-मुंबई द्रुतगती मार्ग, बोईसर बुलेट ट्रेन स्टेशन, विरार बुलेट ट्रेन स्टेशन, वाढवण खोल सागरी बंदर, वाढवण विमानतळ, वेस्टर्न डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर, उत्तन-विरार-पालघर सी लिंक, इगतपुरी-वाळवण द्रुतगती मार्ग आणि विरार-अलिबाग मल्टी मॉडेल कॉरिडॉर हे चौथ्या मुंबईला जोडले जाणार आहेत. देशातील ८ मोठे प्रोजेक्ट डायरेक्ट कनेक्ट होणार आहेत.

# कायम राहतो थकवा, बॅकपेन...

## किडनी डॅमेजच्या ६ संकेतांवरुन ओळखा सद्यस्थिती




जर मूत्रपिंडाच्या कार्यात समस्या असेल तर अनेक प्रकारच्या समस्या उद्भवू शकतात. त्यामुळे हृदयरोग देखील होऊ शकतो. ६ लक्षणांवरुन ओळखा मूत्रपिंड खराब होत चाललं आहे.

मूत्रपिंड हे आपल्या शरीरातील अत्यंत गुंतागुंतीचे अवयव आहेत, ज्यांचे मुख्य कार्य रक्तातील अतिरिक्त पाणी आणि कचरा फिल्टर करणे आणि मूत्र तयार करणे आहे. याशिवाय, ते इलेक्ट्रोलाइट संतुलन राखण्यात आणि रक्तदाब नियंत्रित करण्यात देखील महत्त्वाची भूमिका बजावतात.

अशा परिस्थितीत, मूत्रपिंड निरोगी ठेवणे खूप महत्वाचे आहे. जर मूत्रपिंडाच्या कार्यात समस्या असेल तर शरीरात विषारी पदार्थ आणि जास्त द्रव जमा होऊ शकतात. यामुळे थकवा, सूज, श्वास घेण्यास त्रास, अशक्तपणा आणि हृदयाशी संबंधित आजार यासारख्या गुंतागुंत होऊ शकतात.

पण तुम्हाला माहिती आहे का की मूत्रपिंडाच्या कार्यात बिघाड तुम्हाला स्वतःलाही कळू शकतो. जर तुम्ही तुमच्या शरीरातील काही लक्षणांकडे लक्ष दिले तर तुम्हाला वेळेवर कळू शकते की मूत्रपिंड त्यांच्या सामान्य क्षमतेनुसार काम करत नाहीत. या लक्षणांबद्दल आम्हाला माहिती द्या.

मूत्रपिंडाच्या नुकसानाची ६ लक्षणे -आरोग्य प्रशिक्षक मिरुणा भास्कर यांनी त्यांच्या इंस्टाग्रामवर एक व्हिडिओ शेअर केला आहे ज्यामुळे लोकांना मूत्रपिंडाच्या नुकसानाच्या लक्षणांबद्दल जागरूकता येते. त्यांनी सांगितले की जर शरीरात ही चिन्हे दिसली तर याचा अर्थ मूत्रपिंडाचे नुकसान झाले आहे असा होऊ शकतो-

सहा महत्त्वाची लक्षणे

थकवा - जर तुम्ही खूप थकलेले राहिलात तर याचा अर्थ असा होऊ शकतो की तुमचे मूत्रपिंड पुरेसे लाल रक्तपेशी तयार करू शकत नाहीत. यामुळे तुम्हाला थकवा आणि कमकुवतपणा जाणवतो.

पाठदुखी - तीक्ष्ण किंवा दंश करणारा पाठदुखी मूत्रपिंडातील दगड किंवा मूत्रमार्गात अडथळा निर्माण झाल्यामुळे होऊ शकते. अशा परिस्थितीत, याबद्दल तुमच्या डॉक्टरांचा सल्ला घ्या.

त्वचेचा त्रास - जर तुम्हाला वारंवार त्वचेत खाज सुटणे किंवा जळजळ होत असेल तर ते रक्ताभिसरण बिघडल्याचे लक्षण असू शकते. अशा परिस्थितीत, या लक्षणाकडे दुर्लक्ष करू नका.

लघवीत बदल - जर तुम्ही खूप वेळा किंवा खूप कमी वेळा शौचालयात जात असाल, तर याचा अर्थ असा की तुमच्या मूत्रपिंडांना कचरा योग्यरित्या फिल्टर करण्यात अडचण येत आहे. अशा परिस्थितीत, जर लघवीच्या वारंवारतेत बदल होत असेल, तर नक्कीच डॉक्टरांचा सल्ला घ्या.

फेसयुक्त लघवी -याशिवाय, जर तुमच्या लघवीमध्ये भरपूर फेस असेल, तर ते सामान्य नाही. लघवीतील बुडबुडे प्रथिने गळती दर्शवू शकतात, हे मूत्रपिंडाच्या नुकसानाचे स्पष्ट लक्षण आहे.

घोट्यांमध्ये सूज - जर तुम्हाला ही चिन्हे दिसली, तर समजून घ्या की मूत्रपिंडात काहीतरी गडबड आहे. खरं तर, जेव्हा मूत्रपिंड जास्त पाणी कार्यक्षमतेने काढून टाकू शकत नाहीत तेव्हा द्रव धारणा होते.

पान १ वरून पुढे...

## पंतप्रधान नरेंद्र...

मोटरसायकलपासून ५० मीटर अंतरावर सापडला. पोस्ट मॉर्टम रिपोर्टनुसार, त्यांचा गळा चिरण्यात आला होता आणि त्यांच्या शरीरावर, पाठीवर आणि चेहऱ्यावर धारदार शस्त्राने वार करण्यात आले होते. या प्रकरणाला १८ महिन्यांहून अधिक काळ लोटला असला तरी, आरोपींना अद्याप अटक करण्यात आलेली नाही. विष प्राशन केल्यानंतर ज्ञानेश्वरी मुंडे यांना तातडीने जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. त्यांची प्रकृती स्थिर असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहे . अशातच आता न्याय कधी मिळणार? असा संतप्त सवाल विचारला जात आहे. महादेव मुंडे यांच्या हत्येचा तपास संथ गतीने सुरू असल्याचा आरोप ज्ञानेश्वरी मुंडे वारंवार करत होत्या. गेल्या दीड वर्षांपासून त्या न्यायाच्या प्रतीक्षेत होत्या. न्याय मिळत नसल्याने त्यांनी यापूर्वीच आत्म दहनाचा इशारा दिला होता. त्यांनी हा गंभीर निर्णय घेत पोलीस अधीक्षक कार्यालयातच हे टोकाचे पाऊल उचलल्याने प्रशासकीय व्यवस्थेवर अनेक प्रश्नचिन्हे निर्माण झाली आहेत.

## नारायण गड...

सर्व का सुरू केले आणि कशासाठी हे सर्व सामान्य लोकांसाठी न सुटणार कोड आहे. हे कशासाठी होत आहे कोणाला या प्रकरणाच्या आडून काय साधायचे आहे हे सर्व भाविकांना कळायला मार्ग नाही मात्र

पान १ वरून पुढे...

त्यांनी आपल्या स्वतःच्या स्वार्थासाठी गडाच्या नावावरून असे प्रकार करणे अशोभनीय आहे गड अनेकांच्या अस्मितेचा प्रश्न आहे आणि हीच अस्मिता वर्तमान पत्रे इलेक्ट्रॉनिक मीडिया सोशल मीडिया च्या माध्यमातून चव्हाट्यावर आणण्याचे प्रकार सुरू आहे हे सर्व प्रकार पाहून आमच्या सारख्या अनेक गडावर भक्ती असणाऱ्या भाविकांना वेदना होत आहेत अन् अश्याच वेदना आमच्या सारख्या लाखो लोकांच्या आहेत. गड हा राजकारणाचा विषय नसून भक्तीचा शक्तीचा संगम आहे यात राजकारण नको व्हायला पाहिजे या मुळे एका प्रकारे गडाची बदनामी होत आहे ही नको व्हायला पाहिजे, नको त्या चर्चा घडवून आपल्याच श्रद्धास्थान असलेल्या शक्तीपीठाची आपण कितपत श्रद्धा अबाधित ठेवत आहोत हा विचार केला पाहिजे. एकविचाराणे हा विषय मिक्ला तर गडावर भक्ती श्रद्धा असणाऱ्या भाविकांना वेगळी मनःशांती होईल. त्या साठी बीड जिल्ह्यातील संत महंतांनी पुढाकार घेवून समाजातील जुने जाणते ज्येष्ठ मान्यवरांच्या उपस्थितीत एक सामूहिक बैठक घेत हा विषय लवकरात लवकर संपुष्टात आणून मिटवावा अशी आमच्या सारख्या हजारो भाविक भक्तांची आणि बध्दा असणाच्या तमाम जनांची अपेक्षा आहे जेवढ्या लवकर हा प्रश्न मिटेल तेवढ्या लवकर मिटवून घ्यावा व जनते समोर जाहीर करावा खर तर हा विषय हित पर्यंत चावलाच पाहिजे नको होता हा विषय एवढ्या मोठ्या प्रमाणात का लंबवण्यात आला हेच कळायला मार्ग नाही म्हणून बातून गडाची बदनामी होता कामा नये याची दक्षता घेत तत्काळ हा विषय संपवावा अशी कळकळीची भावना पत्रकाद्वारे गडाचे भक्त अविनाश

पान १ वरून पुढे...

नाईकवाडे, महेश धांडे यांनी व्यक्त केली आहे.

## बीडचे तहसीलदार...

कपाशीचे पीक घेत असत . तथापि कपाशीच्या पिकावर असणाऱ्या रोगराई , त्यास लागणारा खर्च इत्यादी विचारात घेता त्यांना सोयाबीन पीक हे परवडत आहे . शासनाच्या शेतकऱ्यांसाठी अनेक योजना असतात . कृषी विभाग , महसूल विभागामार्फत या योजनांची अंमलबजावणी होत असते . शेतकऱ्यांचे काय प्रश्न आहेत याबद्दलची माहिती प्रत्यक्ष भेटी दिल्याशिवाय कळत नाही . त्या अनुषंगाने तहसीलदारांची प्रत्यक्ष शेतावर भेट महत्त्वाची ठरते. बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन हे प्रत्येक तालुक्यास भेट देऊन सर्वसामान्य जनता, नागरिक यांचे प्रश्न समजावून घेत आहेत . बीडचे अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक यांनी आल्यापासून अनेक उपक्रम राबविण्यास सुरुवात केलेली आहे . शेतकऱ्यांच्या अडचणी असल्यास ते व्यवस्थितरित्या समजून सांगतात . संबंधित उपविभागीय अधिकारी , तहसीलदार यांच्याशी सरळ संपर्क साधून नागरिकांची कामे सोप्या पद्धतीने कशी होतील याची दक्षता बाळगतात. बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव या शेतकऱ्यांप्रती अत्यंत कनवाळू आहेत . सर्वसामान्य शेतकऱ्यांची कामे लवकर झाली पाहिजे, फेरफार लवकर झाले पाहिजे , फार्मर आयडी लवकर निघाले पाहिजे यासाठी त्या वेळोवेळी बीड , गेवराई , शिरूर कासारचे तहसीलदार , नायब तहसीलदार , मंडळ अधिकारी , तलाठी यांचा पाठपुरावा करत असतात. राज्याचे महसूल मंत्री

पान १ वरून पुढे...

चंद्रशेखर बावनकुळे यांनी शेतकऱ्यांसाठी अनेक महत्त्वाच्या योजना सुरू केल्या आहेत . विशेषता बारा फुटाचा रस्ता , सातबारा वरील अनावश्यक नोंदी कमी करण्यासाठी जिवंत सातबारा मोहीम राबविणे इत्यादी अनेक शेतकरी हिताचे निर्णय त्यांनी घेतले आहेत . त्यांचे निर्णय स्थानिक पातळी पर्यंत पोहोचले किंवा नाही याची खात्री करण्यासाठी तहसीलदार चंद्रकांत शेळके झटत असल्याचे दिसून येते . बीड तालुक्यातील पीक पेरणीचा विचार केला असता बाजरी ९८५६ हेक्टरवर , मका २१५४ हेक्टर , तूर ५४०८ हेक्टर , मूग ३२४५ हेक्टर , उडीद ३४१५ हेक्टर , भुईमूग ४० हेक्टर , तीळ १५ हेक्टर , सोयाबीन ४६,२४१ हेक्टरवर , कापूस ५१,८२४ हेक्टरवर अशाप्रकारे १, २२, २५३ हेक्टरवर पेरणी झाल्याचे दिसते. बीड जिल्ह्यात एकूण ११ तालुके आहेत . या सर्व तालुक्यांचा विचार केला असता सरासरी ८७% हेक्टरवर खरिपाची पेरणी झाल्याचे समजते . यावर्षी मे महिन्याच्या शेवटी शेवटी चांगल्या प्रकारे पाऊस झाला असला तरी जून महिन्यातील पाऊसमान हे सलग दिसत नाही . अधून मधून पावसाच्या सरी येतात . त्यामुळे पिके तग धरून आहेत . तथापि मोठ्या पावसाची प्रतीक्षा दिसून येते. आजच्या तहसीलदारांच्या भेटीमुळे पोथरा येथील शेतकरी आनंदी झाल्याचे दिसून आले . माझ्या शेतात तहसीलदार यांनी स्वतः येऊन कोळपणी केली हे माझे भाग्य आहे, असे दराडे यांनी नमूद केले . बीड जिल्ह्यातील अधिकाऱ्यांनी तहसीलदार शेळके यांच्याप्रमाणे क्षेत्रिय भेटी दिल्या , शेतकऱ्यांच्या अडीअडचणी समजून घेतल्या तर निश्चितच प्रशासनाबद्दलची नागरिकांची भावना सकारात्मक होईल यात शंका नाही.

पान ४ वरून पुढे...

## राज्य शासनाच्या...

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-३२, येथून विहित नमुन्यातील अर्ज प्राप्त करुन घ्यावयाचे आहेत. अर्जाचे नमुने http://dgipr.maharashtra.gov.in/ या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

## प्रवीण गायकवाड...

तालुकाध्यक्ष राहुल जाधव, अनिल तनपुरे, शिवसेना (उबाठा) तालुकाध्यक्ष मुकुंद शिंदे, प्रकाश वीर, निखिल पवने, सुहास मडके, निलेश गांगुर्डे, आकाश कांकरिया ,कृष्णा चौरे, बाळासाहेब गायकवाड, तालुकाध्यक्ष (वंचित बहुजन आघाडी) तुकाराम नागरगोजेसह सामाजिक कार्यकर्त्यांनी स्वाक्षऱ्या करून आपला तीव्र निषेध नोंदवला.

## जिल्हास्तर शालेय...

फुटबॉल स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेने २०२५-२६ मधील शालेय क्रीडा स्पर्धांचा शुभारंभ होणार आहे. सदर स्पर्धा हया १५ वर्षा खालील मुले व १७ वर्षाखालील मुले व मुली या वयोगटात होत आहेत. दि. २४ जुलै २०२५ रोजी १७ वर्षाखालील मुले व मुली तर दि. २५ जुलै २०२५ रोजी १५ वर्षाखालील मुले या वयोगटातील स्पर्धा होतील. स्पर्धेचे प्रवेश आणि प्रवेश शुल्क ऑनलाईन पद्धतीने दि. २३ जुलै २०२५ रोजी रात्री १०.०० वाजेपर्यंत स्विकारले जाणार आहेत. स्पर्धेतील सामने जिल्हा क्रीडा संकुल, बीड च्या मैदानावर घेण्यात येणार आहेत. जिल्हास्तर स्पर्धेनंतर विभागस्तर आणि राज्यस्तर सुब्रतो मुखर्जी चषक फुटबॉल स्पर्धा घेण्यात येणार आहेत. विभागस्तर शालेय सुब्रतो कप फ ुटबॉल स्पर्धा हया बीड येथे दि. २८ ते २९ जुलै २०२५ रोजी जिल्हा क्रीडा

पान ४ वरून पुढे...

संकुल मैदान, बीड येथे होणार आहेत. विभागस्तर स्पर्धेतील वयोगट निहाय विजयी संघांना राज्यस्तर स्पर्धेत प्रवेश मिळणार आहे. जिल्हास्तरीय स्पर्धेत सहभागापुर्वीच www.subrotocup.in या संकेतस्थळावर खेळाडू व संघाची नोंदणी करणे अनिवार्य आहे. तसेच प्रत्येक सहभागी संघानी रू. २०००/- प्रवेश फी भरलेल्या नोंदणीकृत संघांनाच या स्पर्धेत सहभागी करून घेण्यात येईल. राज्यस्तर स्पर्धेतील विजेत्या संघाला सुब्रतो मुखर्जी स्पोर्टस एज्युकेशन सोसायटीतर्फे आयोजित राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होण्याची संधी मिळणार आहे. शालेय सुब्रतो मुखर्जी चषक फुटबॉल स्पर्धेच्या अधिक माहितीसाठी क्रीडा अधिकारी श्री. कालिदास होसूरकर ९४२१५९५५१५, स्पर्धा संयोजक श्री. जितेंद्र आराक ९२२६४८१७२८ या भ्रमणध्वनी क्रमांकावर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी श्री. अरविंद विद्यागर यांनी केले आहे.

## अट्टल महाविद्यालयास...

कौशल्य विकास केंद्र अंतर्गत जी.एस.टी. असिस्टंट व ग्राफिक डिझाईन हे दोन कोर्स चालवले जातात. जागतिक युवा कौशल्य विकास दिनानिमित्त जन शिक्षण संस्था बीड येथे दि. १५ जुलै रोजी आयोजित कार्यक्रमात जिल्ह्यातील उत्कृष्ट कौशल्य विकास प्रशिक्षण संस्था म्हणून गेवराई येथील र. भ. अट्टल महाविद्यालयास सन्मानित करण्यात आले. त्याबद्दल महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. रजनी शिखरे यांच्या हस्ते केंद्र सम न्वयक डॉ. हनमंत हेळंबे, प्रशिक्षक डॉ. संदीप वंजारी, डॉ. राहुल माने, प्रा. स्वाती कुलकर्णी, प्रा. आदिती जाधव यांचे अभिनंदन करून गौरविण्यात आले. यावेळी उपप्राचार्य डॉ. प्रशांत पांगरीकर, आयक्यूएसी समन्वयक बालाजी रुपनर, प्रबंधक भास्कर सुरवसे आदींची उपस्थिती होती. बीड येथे नुकत्याच संपन्न झालेल्या सन्मान सोहळ्याच्या प्रसंगी सहाय्यक आयुक्त सुशील उचले, दै. दिव्य मराठीचे ब्युरो चिफ अमोल मुळे, दै. दिव्य

पान ४ वरून पुढे...

लोकप्रभाचे उपसंपादक नितीन क्षीरसागर, प्रा. उपेंद्र कुलकर्णी, श्री. गंगाधर देशमुख यांच्या हस्ते केंद्राचे समन्वयक डॉ. हनमंत हेळंबे यांना सन्मानित करण्यात आले होते. या यशाबद्दल महाविद्यालयाच्या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. प्राचार्य, केंद्र समन्वयक आणि प्रशिक्षकांवर प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी आणि शिक्षणप्रेमी गेवराईकरांनी अभिनंदनाचा वर्षाव केला.

## स्थानिक स्वराज्य...

मार्गदर्शनाखाली परळी वैजनाथ तालुक्यातील प्रत्येक जिल्हा परिषद सर्कल, पंचायत समिती गण तसेच गावागावात काँग्रेस पक्षाची बांधणी करण्याचे काम युद्ध पातळीवर सुरू आहे. पक्षातील सर्व जुन्या आणि नव्या कार्यकर्त्यांना तर संधी मिळेलच परंतु नव्याने पक्षात येऊ इच्छित असलेल्या सर्वांना समान न्यायाने संधी दिली जाईल. त्यामुळे पक्ष संघटनेत काम करण्याची इच्छा असेल किंवा आगामी होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत उमेदवार म्हणून भाग घेण्याची इच्छा असेल अशा कार्यकर्त्यांनी आमच्याशी संपर्क साधावा असे आवाहन काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष ड.प्रकाश मुंडे यांनी केले आहे.

## मिल्लीया प्रा.शा....

तपासणी करण्यात आली. भालदार पुरा येथील मिल्लीया प्राथमिक शाळेत मंगळवार दिनांक १५ जुलै २०२५ रोजी सकाळी १०:०० ते दुपारी १:०० वाजेपर्यंत हे आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. या शिबिराचा विद्यार्थ्यांसह मातांनीही मोठ्या प्रमाणात लाभ घेतला. आरोग्य तपासणी शिबिरात मातांची तपासणी शहरातील सुप्रसिद्ध गायनॅकॉलॉजिस्ट डॉ. रेश्मा पठाण यांनी केली. तर विद्यार्थ्यांची तपासणी डॉ. मसरत जहाँ खादरी यांनी केली. विशेष म्हणजे या शिबिरासाठी दोन्ही डॉक्टर्सनी कुठलेही

पान ४ वरून पुढे...

शुल्क न आकारता विनामूल्य सेवा दिली. आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन अंजुमन ईशात-ए-तालीम संस्थेच्या सचिव खान सबिहा बेगम बाजी यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्याध्यापिका मिर्झा कनिज़ फातेमा आणि पर्यवेक्षिका रिज़वाना बेगम कादरी यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाजीया खान बाजी यांनी केले,शाजीया खान बाजी, यांनी ह्या कार्यक्रमाचे अतिशय सुंदर असे सूत्रसंचालन केले व शाळेच्या प्रत्येक कार्यक्रमात ते सूत्रसंचालन करतात यामुळे शाळेतील सर्व शिक्षिका यांच्याकडून त्यांचे कौतुक करण्यात येत आहे, हे आरोग्य शिबिर यशस्वी करण्यासाठी हाजरा बाजी, सबीया खतीब बाजी, मसरत बाजी, निशात बाजी, शाज़ीया बाजी, नजमुसहेर बाजी, सना बाजी, अरशीया बाजी, तसलीम बाजी, सबा फातेमा बाजी, सबा अंजुम बाजी यांच्यासह शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनीही परिश्रम घेतले.

## लोकनेते सुंदररावजी...

सामाजिक बांधिलकी तसेच केंद्र व महाराष्ट्र शासनाच्या वृक्ष लागवड व संवर्धन उपक्रमा अंतर्गत कारखाना दरवर्षी कारखाना परिसरात वृक्ष लागवड करीत असुन आतापर्यंत कारखाना परिसरात एकुण ११७०९ झाडे लावणेत आलेली असुन ती चांगल्या पध्दतीने जोपसलेली आहेत. या कार्यक्रमास कारखान्याचे कार्यकारी संचालक श्री.आर.सी. बडगुजर, जनरल मॅनेजर (आसवणी) श्री.डी.एम.वरे, जनरल मॅनेजर (इंजि.) श्री.एस.एस. शिनगारे, मुख्य शेतकी अधिकारी श्री. आर. आर. देशमुख, सचिव श्री. सुरेश लगड, चिफ अकोटंट श्री.एस.बी.घाडगे, चिफ केम ीस्ट श्री.बी.एस. झोडगे, मार्केटींग मॅनेजर श्री. जुनेद बागवान, पर्यावरण अधिकारी श्री.डी.डी.पोपळे, पर्चेस ऑफिसर श्री.जे.एन. पाटील, सिव्हील इंजिनिअर श्री.डी.बी.मोरे, कारखान्यातील सर्व कर्मचारी व कामगार मोठ्या संख्येने उपस्थीत होते.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# नागपूरमधील विधानभवनाची विस्तारीत इमारत भव्यदिव्य असेल: विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर

## इमारतीच्या आराखड्याचे सादरीकरण

**मुंबई । प्रतिनिधी**

नागपूरमधील विधानभवनच्या इमारतीचे विस्तारीकरण व प्रस्तावित नव्या प्रशासकीय इमारतीच्या आराखड्याचे आज सादरीकरण करण्यात आले. विस्तारीकरण व प्रस्तावित इमारतीचे काम भव्यदिव्य असे व्हावे, असे विधानसभा अध्यक्ष ॲड. राहूल नार्वेकर यांनी यावेळी सांगितले. यावेळी विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, संसदीय कार्य मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह भोसले आदी उपस्थित होते. वास्तुविशारद हाफिज कॉन्ट्रॅक्टर यांनी आराखड्याचे सादरीकरण केले.



नागपूरमधील सध्या अस्तित्वात असलेल्या विधानसभेच्या जागेवर नवीन सात मजल्याचे संकुल उभारण्यात येणार असून हे विस्तारीकरण करताना सध्याच्या इमारतीची ऐतिहासिक शैली अबाधित राहिल, याची काळजी घेण्यात येणार आहे. विस्तारीकरणामध्ये एकाच इमारतीत सेंट्रल हॉल, विधानसभा, विधानपरिषद सभागृह, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, विधानसभा अध्यक्ष, विधानपरिषद सभापती, विरोधी पक्ष नेते यांचे दालन आदी असणार आहेत. तर शेजारीच मंत्रिमंडळ सदस्यांसाठी वेगळी सहा मजल्याची इमारत उभारण्यात येणार आहे. तसेच वाहनतळ, उपहारगृह, अभ्यागत कक्ष, सुरक्षा कक्ष आदी सुविधा असणार आहेत. तसेच शासकीय मुद्रणालयाची जागा विधीमंडळास मिळाली असून या जागेवर मंत्रालयीन प्रशासकीय कार्यालयांसाठी सुमारे चार लाख चौ.फुटाची चौदा मजली भव्य दिव्य अशी इमारत उभारण्यात येणार आहे. विधानभवन परिसर व प्रस्तावित प्रशासकीय इमारत यांना भुयारी टनेलने जोडण्यात येणार आहे. नागपूरमधील विधानभवनाच्या इमारतीचे विस्तारीकरण व प्रस्तावित नव्या प्रशासकीय इमारतीचे काम महाराष्ट्र पायाभूत सुविधा महामंडळाच्या मार्फत करण्यात येणार आहे. महामंडळाने यासंबंधीचा सविस्तर प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश विधानसभा अध्यक्ष ड. नार्वेकर यांनी यावेळी दिले. विधानभवनाचे विस्तारीकरण व नवीन इमारत बांधताना हरित इमारतीची संकल्पना राबविण्यात यावी. विधानभवनाच्या प्रस्तावित विस्तारीकरणामध्ये अभ्यागतांसाठी पुरेशी जागा तसेच उपहारगृहाची सोय असावी, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

# दिव्यांग, ज्येष्ठांना मोफत कृत्रिम साहित्य वाटपासाठी पूर्व तपासणी शिबिर

**बीड । प्रतिनिधी**

खासदार बजरंग सोनवणे यांच्या संकल्पनेतून जिल्ह्यामध्ये दिव्यांग व्यक्ती व जेष्ठ नागरिकांना मोफत कृत्रिम साहित्य साधने वाटपाच्या अनुषंगाने पूर्व तपासणी शिबिर प्रत्येक तालुक्यातील पंचायत समितीत १८ ते ३० जुलै २०२५ या कालावधीत आयोजित करण्यात आले आहे. शिबिराचे उद्घान १८ जुलै रोजी सकाळी १० वा. खासदार सोनवणे यांच्या हस्ते केज येथे होणार आहे. या शिबिराचा दिव्यांग व जेष्ठ नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा समाज कल्याण अधिकारी एस. एन. मेश्राम व सर्व गटविकास अधिकारी यांनी केले आहे. शिबिरात दिव्यांगांना जयपुरी फूट, कृत्रिम हात, क्लीपर, व्हिलचेअर, ट्रायसिकल, क्रचेस, वॉकिंग स्टीक, ब्रेल किट, स्मार्ट फोन, श्रवणयंत्र यांसह जेष्ठ नागरिकांना बेल्ट, वॉकर, काठ्या, चष्मे, कृत्रीम दात, खुबड, कृत्रीम अवयव, श्रवणयंत्र, व्हिलचेअर कमोडसहीत, सिलीकॉन खोम तकीया, नीब्रेस, स्पायनल सपोर्ट, सरवायकल कॉलर यासह इतर साधने उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यासाठी दिव्यांगांनी दिव्यांग प्रमाणपत्र आणि णऊखऊ कार्ड, आधार कार्ड, रेशन कार्ड, वार्षिक उत्पन्नाचा दाखला उत्पन्न (मासिक २२ हजार ५०० रु. किंवा वार्षिक २ लक्ष ७० हजार रूपयांच्या आत असावे.) सोबत आणावीत. जेष्ठ नागरिकांनी आधार कार्ड, रेशन कार्ड, वर्षिक उत्पन्नाचा दाखला उत्पन्न (मासिक १५ हजार रु. किंवा वर्षिक एक लक्ष ८० हजार रूपयांच्या आत असावे) सोबत कागदपत्रे आणावयाची आहेत.

केज येथे १८, अंबेजोगाई १९, बीड २१, माजलगाव २२, पाटोदा २३, वडवणी २४, आष्टी २५, धारूर २६, परळी वै.२८, शिरूर २९ आणि गेवराई येथे ३० तारखेला संबंधित पंचायत समिती कार्यालयात सकाळी १० ते ६ वाजेपर्यंत शिबिरांचे आयोजन करण्यात आले असल्याचेही श्री. मेश्राम यांनी कळवले आहे.

# 'इस्लाम द-अल्टिमेट आर्ट ऑफ लिव्हिंग' हे एक क्रांतिकारी पुस्तक डॉ. श्रीपाल सबनीस

## पुस्तकाचे लोकार्पण सोहळा संपन्न

**छ. संभाजी नगर । प्रतिनिधी**

'इस्लाम द-अल्टिमेट आर्ट ऑफ लिव्हिंग' या पुस्तकाचा लोकार्पण सोहळा आज मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते हज हाऊस, छ. संभाजीनगर. येथे एका भव्य कार्यक्रमात पार पडला. प्रख्यात पत्रकार अशोक वानखेडे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष पद जेष्ठ साहित्यिक डॉ. इकबाल मिन्ने यांनी भूषविले.



## ज्येष्ठ नागरीकांसाठी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन

**बीड । प्रतिनिधी**

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद शाखा,बीड आणि सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू महाविद्यालय,नाट्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १७ जुलै २०२५ रोजी ज्येष्ठ नागरीकांसाठी संधीकाली या अशा, धुंदल्या दिशा दिशा या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात करण्यात आले आहे. ज्येष्ठ नागरिकांच्या जीवनामध्ये आनंद निर्माण व्हावा, त्यांच्या कला गुणांना वाव मिळावा, त्यांना जे छंद तरूण वयात असताना जोपासता आले नाहीत त्यासाठी एक रंगमंच उपलब्ध करून देण्याच्या हेतूने अध्यक्ष अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद,शाखा बीड तथा नवगण शिक्षण संस्थेच्या सहसचिव डॉ. दीपाताई क्षीरसागर यांच्यावतीने दरवर्षीप्रमाणे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

# मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी ठरला रुग्णांसाठी जीवनदायी !

## मागील सहा महिन्यात ५८७ रुग्णांना ४ कोटी ९० लाखांची मदत

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांसाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी आशेचा नवा किरण ठरला आहे. गेल्या पाच महिन्यांत या निधीच्या माध्यमातून जवळपास ४ कोटी ८९ लाख ९३ हजार रुपयांचे अर्थसाहाय्य रुग्णांना देण्यात आले असून उपचारासाठी पुरेसा आर्थिक आधार नसलेल्या कुटुंबांना मोठा दिलासा मिळाला आहे.

अहिल्यानगर येथील जिल्हाधिकारी कार्यालयात १ मे २०२५ रोजी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते उद्घाटन झालेल्या या कक्षात दाखल अर्जांची तातडीने पडताळणी करून ते मुंबईकडे पाठवले जातात. कक्षाचे काम डॉ. निळकंठ ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली सदस्य स्वप्निल कच्छवे व वैद्यकीय समाजसेवा अधीक्षक अजय काळे यांच्या देखरेखीखाली सुरु आहे.

मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्ष

या निधीतून कर्करोग, हृदयविकार, मेंदूविकार, नवजात बालकांचे गंभीर आजार, मूत्रपिंड व लिव्हर प्रत्यारोपण, अपघातातील शस्त्रक्रिया, महागड्या ऑर्थोपेडिक शस्त्रक्रिया अशा गंभीर व जीवघेण्या आजारांवरील उपचारासाठी मदत दिली जाते. याशिवाय, मदत न मिळाल्यास महात्मा फुले जनआरोग्य योजना, आयुष्मान भारत, राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम यासारख्या पर्यायी योजनांची माहितीही रुग्णांना देण्यात येते. मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्ष जिल्हाधिकारी कार्यालयाच्या दुसऱ्या मजल्यावर, निवासी उपजिल्हाधिकारी कार्यालयाशेजारी कार्यरत असून नागरिकांनी थेट येथे संपर्क साधावा, असे आवाहन डॉ. ठाकरे यांनी केले आहे.

अर्जदारांनी ही कागदपत्रे जिल्हाधिकारी कार्यालय, अहिल्यानगर, २ रा मजला, मुख्यमंत्री सहाय्यता कक्षात थेट जमा करावीत किंवा ई-मेलद्वारे (aao.cmrf-mhgov.in) पाठवावीत. अर्ज केल्यानंतर मिळालेल्या नोंदणी क्रमांकाच्या साहाय्याने https://cmrf.maharashtra.gov.in/applicantEnquiryForm.action या संकेतस्थळावर अर्जाची सद्यस्थिती तपासता येते. जिल्ह्यातील गरजू रुग्णांना जीव वाचविणाऱ्या या वैद्यकीय मदत उपक्रमाचा अधिकाधिक लाभ घ्यावा, असे आवाहन मुख्यमंत्री सहाय्यता कक्षातर्फे करण्यात आले आहे.

# अंबादास दानवे हे विधानपरिषदेत चर्चेची उंची वाढवणारे विरोधी पक्षनेते : उपमुख्यमंत्री अजित पवार



## अंबादास दानवे यांच्या सन्मानार्थ निरोप समारंभ

**मुंबई । प्रतिनिधी**

अंबादास दानवे हे विधानपरिषदेतील चर्चेची उंची वाढवणारे आणि संयमी, परखड भूमिका मांडणारे विरोधी पक्षनेते असल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले. विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांचा कार्यकाळऑगस्ट २०२५ मध्ये संपत असल्याने विधानपरिषदेत त्यांच्या सन्मानार्थ निरोप समारंभ आयोजित करण्यात आला. या वेळी उपमुख्यमंत्री अजित पवार बोलत होते. उपमुख्यमंत्री पवार यांनी अंबादास दानवे यांच्या कार्यशैलीचे कौतुक करताना सांगितले की, अंबादास दानवे हे परखडपणे प्रश्न मांडणारे, अभ्यासू आणि सभागृहाच्या डेकोरमचे भान राखणारे नेते होते. त्यांनी कायम सामान्य जनतेचे प्रश्न सभागृहात प्रभावीपणे मांडले.

विरोधी पक्षनेते दानवे यांनी सर्व सदस्यांचे आभार मानत भावुक शब्दांत आपल्या कार्यकाळाचा आढावा घेतला. ही संधी मला जनतेच्या प्रश्नांना आवाज देण्यासाठी मिळाली, याचे समाधान आहे, असे त्यांनी सांगितले.

हा निरोप समारंभ जरी औपचारिक असला, तरी त्यात एकात्मता, सन्मान आणि सदिच्छा यांचा भाव पुरेपूर दिसून आला. यावेळी सभापती प्रा. राम शिंदे, उपसभापती डॉ. निलम गोऱ्हे, सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांच्यासह सदस्य सर्वश्री उद्धव ठाकरे, प्रवीण दरेकर, ॲड. अनिल परब, सतेज पाटील, शशिकांत शिंदे यांनी आपल्या भावना यावेळी व्यक्त केल्या.

दैनिक मराठवाडा पत्र दि. १६/०७/२०२५

**टी सी हरवला आहे.**

**अशोक मोहन ताटे** या नावाचा १० वी पास चा टीसी पिंपळनेर बीड प्रवासात हरवला आहे.
सापडल्यास संपर्क करावा.
**संपर्क : ९९२१७६२५७०**

# कामगार विभागाच्या नव्या अभ्यासक्रमामुळे न्यायालयांवरील ताण कमी होईल : कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर

**मुंबई । प्रतिनिधी**

कामगार विभागांतर्गत कार्यरत ना. मे. लोखंडे महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्था या राज्यातील एकमेव शैक्षणिक संस्थेमार्फत, उद्योग व आस्थापनांतील अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी कायदेशीर चौकट व शिस्तव्यवस्थापन प्रमाणपत्र अभ्यासक्रमाची सुरुवात करण्यात आली आहे. या अभ्यासक्रमामुळे उद्योग क्षेत्राला कायदेशीर बाबी आणि शिस्तव्यवस्थापन यामध्ये निपुण मनुष्यबळ उपलब्ध होणार आहे. परिणामी बहुतांश शिस्तभंग प्रकरणे आस्थापना स्तरावरच निकाली निघतील आणि न्यायालयांवरील ताण कमी होईल, असा विश्वास कामगार मंत्री ड. आकाश फुंडकर यांनी केला.



नरिमन भवन येथे ना.मे. लोखंडे महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्थेद्वारे प्रस्तावित 'सर्टिफिकेट कोर्स इन लीगल फ्रेमवर्क अँड डिसीप्लीन मॅनेजमेंट' अभ्यासक्रमाचे उद्घाटन कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांच्या हस्ते झाले त्यावेळी ते बोलत होते. यावेळी कामगार विभागाच्या प्रधान सचिव आय.ए.कुंदन, उपसचिव तथा ना.मे. लोखंडे महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्थेच्या संचालक रोशनी कदम-पाटील, उपसचिव दीपक पोकळे, उपसचिव स्वप्नील कापडणीस, कार्यासन अधिकारी दिपाली जपे, संस्थेचे उपसंचालक डॉ. अतुल नौबदे उपस्थित होते.

ही संस्था मुंबई व नागपूर येथे कार्यरत असून, श्रम विज्ञान विषयातील पदव्युत्तर पदवी, पदविका व पीएचडी अभ्यासक्रम राबविते. नव्या शैक्षणिक धोरणानुसार, यापूर्वी चालू असलेल्या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमात सुधारणा करून त्याचे मानवी भांडवल व कर्मचारी व्यवस्थापनातील पदव्युत्तर पदवी असे करण्यात आले आहे. मुंबई विद्यापीठ व नागपूर विद्यापीठाच्या मान्यतेने हा अभ्यासक्रम २०२३-२४ पासून सुरु झाला आहे, अशी माहिती संस्थेच्या संचालिका रोशनी कदम-पाटील यांनी दिली

नवीन शैक्षणिक धोरण-२०२० मध्ये कौशल्याधिष्ठित अल्प मुदतीचे अभ्यासक्रम राबविण्याची शिफारस करण्यात आली आहे. सध्या उद्योग व कारखान्यांमध्ये शिस्तभंग विषयक प्रकरणे हाताळण्यासाठी प्रशिक्षित मनुष्यबळाची कमतरता आहे. त्यामुळे अनेक प्रकरणे थेट न्यायालयात जातात. ही समस्या टाळण्यासाठी आस्थापना स्तरावरच प्रशिक्षित अधिकारी असावेत, हा अभ्यासक्रम त्या दृष्टीने तयार करण्यात आला आहे.

अभ्यासक्रमाची वैशिष्ट्ये: कालावधी - चार महिने, एकूण चार मॉड्यूल, वर्ग वेळ शनिवार किंवा रविवार, कोणत्याही शाखेतील पदवीधर या कोर्ससाठी पात्र असेल. प्रत्यक्ष प्रशिक्षणावर भर असून ऑनलाईन वर्ग सध्या नाही. विद्यापीठ नियमानुसार हा अभ्यासक्रम क्रेडिट असून यशस्वी उमेदवारास विभागामार्फत प्रमाणपत्र देण्यात येईल.

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**

**गेवराई जि.बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्रीमती एस एन पाटील यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक: ६००/२०२५**
**सुंदराबाई भ्र. पांडुरंग धुताडमल व ईतर ४ विरुद्ध निरंक**

ज्याअर्थी मयत नामे **पांडरंग तुकाराम भुताडमल हे दिनांक २८/०४/२०२५ रोजी टाकळगाव, ता. गेवराई जि. बीड** येथे मयत झाले आहे

अर्जदार- १. सुंदराबाई भ्र. पांडुरंग धुताडमल, वय ७२ वर्षे, धंदा घरकाम, रा. टाकळगाव ता. गेवराई जि. बीड, २. श्रीराम पि. पांडुरंग धुताडमल, वय ४१ वर्षे, धंदा शेती, रा. टाकळगाव ता. गेवराई जि. बीड, ३. सुनिल पि. पांडुरंग धुताडमल, वय ३७ वर्षे, धंदा शेती, रा. टाकळगाव ता. गेवराई जि. बीड, ४. सुरेश पि. पांडुरंग धुताडमल, वय ३६ वर्षे, धंदा शेती, रा. टाकळगाव ता. गेवराई जि. बीड, ह.मु. गंधर्व पार्क, काळजेवाडी, चऱ्होली खुर्द, पुणे, ५.रेखा भ्र. राजेंद्र दुनमय, वय ४७ वर्षे, धंदा घरकाम, रा. छत्रपती चौक जवळ, ज्ञानेश्वर पार्क, कृष्णा नगर रोड, पुणे.

शासकीय/निमशासकीय कामकाजांसाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे बाराचे प्रमाणपत्र मिळावे असा त्या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरजु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे **पांडुरंग तुकाराम धुताडमल** रा. मौजे टाकळगाव, ता. गेवराई जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

**पुढील तारीख: २०.०८.२०२५**
**(मार्फत ॲड. एम. डी. धांडे)**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय,क.स्तर, गेवराई**

**(स्वाक्षरीत)**
**क.लिपीक**

**शिक्का**

**जाहीर प्रगटन**

**मा. के. सी. माने सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात, बीड, ता.जि. बीड**
**किरकोळ दिवाणी अर्ज कमांक ११२५ / २०२५**
CNR No. MHBI02000023062025
**शिवाजी बंडू गरके मयत वारस वि. निरंक**

अर्जदार :- १. शिवाजी पि. बंडू गरके गयत वारस, १- १. निलावती भ्र. शिवाजी मस्के, वय -६८ वर्षे, धंदा - घरकाम, रा. पालवण ता. जि. बीड १- २. अनिता भ्र. बाबासाहेब शेळके, वय-४३ वर्षे, धंदा - घरकाम, रा. पालवण ता. जि. बीड १-३. सुनिता भ्र. अशोक शेंदाडे, वय-४२ वर्षे, धंदा-घरकाम, रा. पिंपरगव्हाण ता. जि. बीड १-४. मनिषा भ्र. भारत चित्रे, वय-३४ वर्षे, धंदा - घरकाम, रा. पिंपरगव्हाण ता. जि. बीड १- ५. शिलावती भ्र. वैकुंठ गव्हाणे, वय-४८ वर्षे, धंदा - घरकाम, रा. पारगांव ता. जि. बीड १-६. सुरेश पि. शिवाजी मस्के - मयत - वारस, १-६-१. मनिषा भ्र. सुरेश मस्के, वय - ४६ वर्षे, धंदा-घरकाम, रा. पालवण ता. जि. बीड १-६-२. शंकर पि. सुरेश मस्के, वय - २३ वर्षे, धंदा-शिक्षण, रा. पालवण ता. जि. बीड १-६-३. ओंकार पि. सुरेश मस्के, वय-२१ वर्षे, धंदा-शिक्षण, रा. पालवण ता. जि. बीड १-६-४. मोहीनी भ्र. रविंद्र शेंदाडे, वय- २८ वर्षे, धंदा - घरकाम, रा. पिंपरगव्हाण ता. जि. बीड १-६-५. रोहिणी भ्र. संदीप शेळके, वय-२५ वर्षे, धंदा - घरकाम, रा. पालवण ता. जि. बीड

विरुध्द निरंक

मागणी अर्ज :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार मयताचे वारस म्हणुन मिळणे बाबत.

वरील अर्जदार क. १-१ ते १-५ व अर्जदार क. १-६-१ ते १-६-५ यांनी या न्यायालयात मयत बंडू पाटीलबुवा मस्के यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी मयत बंडू पाटीलबुवा मस्के यांचा मृत्यु दिनांक २५/०६/१९९६ रोजी पालवण ता. जि. बीड येथे त्यांचा मृत्यु झाला. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात वरील मयताचे वारस असल्या बाबत वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्ज दाखल केला आहे. अर्जदार क. १-१ ही मयताची सुन म्हणजे मयत मुलगा शिवाजी बंडू मस्के याची पत्नी असून अर्जदार क. १-२ ते १-५ या मयताच्या विवाहित नाती म्हणजे मयत मुलगा शिवाजी बंडू मस्के याच्या विवाहित मुली आहेत. तसचे अर्जदार क. १-६-१ ही मयताची नात सून म्हणजे मयत बंडु मस्के याचा मयत नातु सुरेश शिवाजी मस्के याची पत्नी असून अर्जदार क. १-६-२ व १-६-३ हे मयत सुरेश शिवाजी मस्के याची मुलं आहेत. व अर्जदार क. १-६-४ व १-६-५ या मयत सुरेश शिवाजी मस्के याच्या विवाहित मुली आहेत. वरील अर्जदार शिवाय मयताचे इतर कोणीही कायदेशिर वारस नाहीत.

मयत बंडू पाटीलबुवा मस्के यांचे मृत्युनंतर वरील अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय कामाकरीत व ईतर कार्यालयीन उपयोगा करीता सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सदरहू मयतांचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन तीस दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवुन आपली हरकत कळवावी. जर मुदतीत कोणीही हरकत न कळविल्यास हे न्यायालय अर्जदारांचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयतांचे वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी. **प्रकरणातील पुढील तारीख १९/०८/२०२५**

आज दिनांक १६ माहे जुलै २०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

(मार्फत ॲड. एस. एस. उबाळे)

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय,क.स्तर, बीड**

**(स्वाक्षरीत)**
**क.लिपीक**

**शिक्का**

दैनिक ● https://marathwadapatra.com
# मराठवाडा पत्र
गुरूवार, दि.१७ जुलै २०२५ पान ४

## राज्य शासनाच्या 'उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार २०२४'साठी प्रवेशिका पाठविण्याकरिता १९ जुलै पर्यंत मुदतवाढ

**बीड । प्रतिनिधी**

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत उत्कृष्ट पत्रकारिता, उत्कृष्ट लेखन, उत्कृष्ट दूरचित्रवाणी वृत्तकथा, उत्कृष्ट छायाचित्रकार, समाज माध्यम आणि स्वच्छता अभियानाबाबत केलेल्या जनजागृतीपर लेखनासाठी पुरस्कार स्पर्धा जाहीर करण्यात आली आहे. या स्पर्धेसाठी दिनांक १ जानेवारी, २०२४ ते ३१ डिसेंबर, २०२४ पर्यंतच्या कालावधीत प्रसिद्ध झालेल्या लेखन/छायाचित्रे/वृत्तकथा यांच्या प्रवेशिका मागविण्यात आल्या आहेत. प्रवेशिका पाठविण्याचा अंतिम दि. ३१ जानेवारी, २०२५ असा होता. आता या पुरस्कारासाठी प्रवेशिका मागविण्याकरिता १९ जुलै, २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. राज्यातील विविध भागातील स्पर्धकांनी संबंधित जिल्हा माहिती कार्यालयाकडून तर मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यातील इच्छुकांनी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, तळमजला, ▶▶ उर्वरित पान २ वर

# दलीत, भुमीहीन, कष्टकरी, कामगार, विद्यार्थ्यांच्या विविध मागण्यांसाठी 'मानवी हक्क अभियान'चा मोर्चा



**माजलगाव । प्रतिनिधी**

दलीत,भूमिहीन, कष्टकरी कामगार, दलित विद्यार्थ्यां व निराधार व्यक्तींच्या विविध मागण्या पूर्ण कराव्यात यासाठी मानवी हक्क अभियान च्या वतिने संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा.डॉ.मिलींद आवाड यांच्या मार्गदर्शनाखाली व बीड जिल्हाअध्यक्ष राजेश क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली १४जुलै रोजी उपविभागीय अधिकारी कार्यालय,माजलगाव येथे मोर्चा काढण्यात आला. प्रसंगी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की,आजतागायत वहिती असलेली सर्व गायरान जमिनी कास्तकरांच्या नावे कराव्यात या जमीनीवर शासनाकडून उभे केले जात असलेले सर्व प्रकल्प रोखावे, ऊसतोड कामगारना माथाडी कामगार कायद्यांच्या अंतर्गत असलेल्या सर्व तरतूदी लागू करुन या मजुरांना विम्याचे संरक्षण लागु करावे, वयोवृदधांना संजय गांधी निराधार व इंदिरा गांधी निराधार योजनेत प्रतिमहा ६हजार रु मासिक अर्थसहाय्य लागु करा,बेघर कूटुबांसाठी घरकुल योजनेसाठी ५लाख रु अशी आर्थिक तरतूद करावी. मागास वर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीत वाढ करुन ती वेळेवर मिळावी,अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, वसंतराव नाईक म हामंडळ, महात्मा फुले विकास महामंडळ , मौलाना आझाद विकास महामंडळ यांना भरीव निधी देण्यात यावा,आर्टी,बार्टी या संस्था ना भरीव निधी उपलब्ध करावा गाव तिथे दलितांना पक्की स्मशान भुमी असावी या मागण्यांचा समावेश आहे.

या मोर्चास महाराष्ट्राचे कार्याध्यक्ष मच्छिंद्र गवारे यांचे सह धोंडीराम पाटोळे,राधिका चिंचोलीकर, मधुकर कांबळे,विष्णु मुजमुले,महादेव उमाप,बंडु लोखंडे,धोंडीराम हातागळे,रघूनाथ कसबे,अमरजित मुजमले यांनी मार्गदर्शन केले,मोर्चाचे सूत्रसंचालन बाबासाहेब थोरात यांनी केले तर आभार शहराध्यक्ष संदीप वाघमारे यांनी केले या मोर्चात महिला, पुरुष, तरुण मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## शासकीय अधिकारी, कर्मचारी यांनी विकसित महाराष्ट्र सर्वेक्षणात सहभागी व्हावे : जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन

**बीड । प्रतिनिधी**

विकसित महाराष्ट्र २०४७ चे नागरिक सर्वेक्षण १७ जुलै, २०२५ पर्यंत पूर्ण करावयाचे आहे. या सर्वेक्षणात सामान्य नागरिकांचा सहभाग महत्वाचा आहे, जेणेकरून त्यांच्या समस्या, शासनाकडून असलेल्या अपेक्षा याबाबत माहिती घेऊन त्यानुसार रोडमॅप तयार करणे शक्य होणार आहे. त्या अनुषंगाने सर्व प्रथम सर्व शासकीय अधिकारी, कर्मचारी यांनी स्वतः https://wa.link/O93s9m

या लिंकवर क्लिक करुन सर्वेक्षणात सहभागी व्हावे. आपल्या कुटुंबातील सर्व सदस्यांना देखील सर्वेक्षणात सहभागी करुन घ्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले आहे.



तद्नंतर आपल्या अधिनस्त किंवा संपर्कात येणाऱ्या सर्व नागरि कांना सर्वेक्षणात सहभाग नोंदविण्यासाठी प्रोत्साहित करावे. आपल्या गावातील, शहरातील तसेच नातेवाईक, मित्रांच्या व्हाट्सएप ग्रुपवरुन याबाबत जागृती करावी, जेणेकरुन बीड जिल्ह्यातून जास्तीत जास्त नागरिकांचा सहभाग नोंदविणे शक्य होणार असल्याचेही जिल्हाधिकारी जॉन्सन यांनी शासकीय यंत्रणाना सांगितले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ०६ मे २०२५ ते ०२ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत १५० दिवसांचा कार्यक्रम राबविण्याची घोषणा केली आहे. त्यामध्ये विकसित महाराष्ट्र २०४७ करिता व्हिजन डॉक्यूमेंट तयार करण्याचा समावेश करण्यात आलेला आहे.

## प्रवीण गायकवाड भ्याड हल्ल्याचा निषेधार्थ तहसीलदार यांना सर्वपक्षीयांचे निवेदन

**पाटोदा । प्रतिनिधी**

अक्कलकोट (जि. सोलापूर) येथे दिनांक १३ जुलै २०२५ रोजी शिव, शिव, शाहु, फुले , आंबेडकर अण्णाभाऊ यांच्या विचारांचे पाईक असणारे राज्यस्तरीय नेते मा. प्रवीणदादा गायकवाड यांच्यावर काही समाजकंटकांनी शाही फेकून आणि अन्य हिंसक प्रकारांनी जीवघेणा हल्ला केला. या घटनेच्या निषेधार्थ पाटोदा तहसीलदार यांना काग्रेस,



शेकाप शिवसेना (उबाठा) यांनी निवेदन देऊन सरकारने संबंधित आरोपींना कठोर शासन कराण्याची मागणी केली. शेकापाचे भाई विष्णुपंत घोलप, राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे ▶▶ उर्वरित पान २ वर

### जिल्हास्तर शालेय सुब्रतो मुखर्जी चषक फुटबॉल स्पर्धा आयोजनाची तारीखेत बदल

**बीड । प्रतिनिधी**

सन २०२५-२६ या वर्षात जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय बीड मार्फत जिल्हा क्रीडा संकुल, बीड येथे दि. १७ ते १८ जुलै २०२५ रोजी करण्याचे निश्चीत करण्यात आले होते परंतु काही तांत्रिक कारणास्तव सदर तारखेत बद्दल करण्यात आला असुन स्पर्धा आयोजनाची सुधारित दिनांक २४ ते २५ जुलै २०२५ या कालावधीत जिल्हास्तर शालेय सुब्रतो मुखर्जी चषक ▶▶ उर्वरित पान २ वर

## अट्टल महाविद्यालयास उत्कृष्ट कौशल्य विकास प्रशिक्षण संस्था पुरस्कार

**गेवराई । प्रतिनिधी**

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, र. भ. अट्टल महाविद्यालय, गेवराई येथील कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभाग, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र बीड यांच्या संयुक्त विद्यमाने आचार्य चाणक्य ▶▶ उर्वरित पान २ वर



## स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका काँग्रेस पक्ष सर्वांना सोबत घेऊन लढवणार

### इच्छुक उमेदवारांनी संपर्क साधावा ; तालुकाध्यक्ष अॅड.प्रकाश मुंडे यांचे आवाहन

**परळी वै. । प्रतिनिधी**

आगामी काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सर्व निवडणुकांमध्ये काँग्रेस पक्ष सर्वांना सोबत घेऊन मैदानात उतरणार असून, पक्षातील सर्व जुन्या आणि नव्या कार्यकर्त्यांना सोबत घेतले जाणार आहे. त्याचबरोबर नव्याने पक्षबांधणी सुरू असून, इच्छुकांनी आमच्याशी संपर्क



साधावा असे आवाहन काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष ड.प्रकाश मुंडे यांनी केले आहे. अखिल भारतीय काँग्रेस कार्यसमितीच्या सदस्या तथा हिमाचल प्रदेश प्रभारी आदरणीय खासदार सौ. रजनीताई पाटील साहेब , माजी मंत्री अशोकरावजी पाटील साहेब, बीड जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे साहेब , अखिल भारतीय राष्ट्रीय किसान समन्वयक बाबुराव मुंडे यांच्या ▶▶ उर्वरित पान २ वर

## मिल्लीया प्रा.शा. (मुलींची) भालदारपुरा येथे मोफत आरोग्य तपासणी शिबीर संपन्न

### शिबिरात २५० विद्यार्थी आणि ८० मातांची झाली आरोग्य तपासणी

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील ख्यातनाम शिक्षण संस्था अंजुमन ईशात-ए-तालीम च्या भालदार पुरा येथील मिल्लीया प्राथमिक शाळा (मुलींची) येथे विद्यार्थी व मातांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात २५० विद्यार्थी आणि ८० मातांची आरोग्य ▶▶ उर्वरित पान २ वर



## लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखाना स्थळी वृक्षारोपन

**माजलगाव । प्रतिनिधी**

लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखाना लि, सुंदरनगर तेलगाव ता.धारुर जि.बीड येथे दि.१६/०७/२०२५ रोजी केंद्र शासनाचे एक पेड मॉ के नाम मोहिमे अंतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय सहकार दिनाचे औचित्य साधून कारखान्याचे जेष्ठ संचालक मा.आ.श्री. प्रकाशदादा सोळंके साहेब व कारखान्याचे मार्गदर्शक मा. श्री. धैर्यशीलकाका सोळंके साहेव यांचे



अध्यक्षतेखाली व मा.चेअरमन साहेब श्री. विरेंद्रदादा सोळंके, मा.व्हाईस चेअरमन साहेब श्री. जयसिंगभैय्या सोळंके व कारखान्याचे कार्यकारी संचालक मा.श्री.आर.सी. बडगुजर साहेब यांचे प्रमुख उपस्थितीत, मा. अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क, बीड श्री. देशमुख व्ही.ए. यांचे हस्ते वृक्षारोपन करण्यात आले. यावेळी मा. चेअरमन साहेब, मा. व्हाईस चेअरमन साहेब व कार्यकारी संचालक यांचेही हस्ते वृक्षारोपन करणेत आले. जार्गातक पर्यावरणाचा समतोल तसेच भावी पिढीच्या उज्ज्वल भवितव्यासाठी ▶▶ उर्वरित पान २ वर

# चकलांबा पोलीस ठाण्याची रेती चोरीविरोधातील धडक कारवाई

### ५ लाख ६० हजारांचा मुद्देमाल जप्त

**बीड । प्रतिनिधी**

चकलांबा पोलीस स्टेशन हद्दीतील राक्षसभुवन परिसरातील गोदावरी नदी पात्रात ट्रॅक्टरद्वारे बेकायदेशीरपणे रेतीची वाहतूक केली जात असल्याची गोपनीय माहिती पोलीसांना प्राप्त झाली. सदर माहितीच्या आधारे पोलीस स्टेशन चकलांबा येथील सपोनि संदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तात्काळ स्टाफ रवाना करण्यात आला. पोलीस पथकाने नदीपात्रात जाऊन घटनास्थळी छापा टाकला असता, एक ट्रॅक्टर रेतासह आढळून आला. ट्रॅक्टर चालकास घटनास्थळीच ताब्यात घेण्यात आले.

या कारवाईत अंदाजे रुपये ५,६०,०००/- किंमतीचा



मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, यामध्ये ट्रॅक्टरसह रेतीचा समावेश आहे. याप्रकरणी आरोपी जमीर आरिफ शेख, वय २१ वर्ष, रा. राक्षसभुवन याच्याविरुद्ध संबंधित कायद्याखाली गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील कायदेशीर कार्यवाही सुरू आहे. सदर कारवाई पोलीस अधीक्षक श्री.नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी निरज राजगुरू यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि संदीप पाटील, पोलीस अंमलदार Asi १३२ वंजारे, PC २००४ कैलास खटाने, झल २३१ प्रशांत घोंगडे, Pc २०६० हनुमान इंगोले यांनी केली आहे.

